| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र शासन | **विभागीय शिक्षण उपसंचालक,**<br>पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,<br>१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१ | w'site : www.dydepune.com<br>e-mail : dydpune@gmail.com<br>Phone : (020) 26122217 |


जा.क्र.शिउसं/उमावि-४०२/पुवि/(संगमेश्वर)/१८/ ५९०८

दिनांक- 10 JUL 2019

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
श्री.संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर-४१३ ००१.

**विषयः-शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यामुळे प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांच्यावर युजीसी कायदयांतर्गत शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत , त्याचप्रमाणे श्री. ए के हुल्ली , उपप्राचार्य कनिष्ठ महाविद्यालय विभाग संगमेश्वर महाविद्यालय,सोलापूर यांच्यार महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत**

**संदर्भः१)महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ तरतुद**
**२) शासन निर्णय (अल्पसंख्यांक विभाग) क्रमांक अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, मंत्रालय, मुंबई ४००.०३२. दि.२७.०५.२०१३**
**३) श्री.महेश पाटील, सोलापूर यांचे पत्र दि.२५.१०.२०१८.**
**४)मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४२/शालार्थ-१९/७७७ दि. २५.०१.२०१९.**
**५)या कार्यालयाचे पत्र दि.०४.०२.२०१९**
**६)प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचे पत्र दि.०९.०२.२०१९**
**७)प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचे पत्र दि.२६.०३.२०१९.**
**८)मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४२/शालार्थ-१९/७७७ दि. २५.०१.२०१९.**
**९)या कार्यालयाचे पत्र दि. २०.०३.२०१९**
**१०)मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४२/२०१९/२९२२ दि.०२.०४.२०१९**
**११) या कार्यालयाचे पत्र दि.२३.०३.२०१९**
**१२) प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचे पत्र दि.२६.०३.२०१९**

उपरोक्त विषयाच्या मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे-१ यांच्या संदर्भिय पत्र क्र-८ नुसार आणि या कार्यालयाच्या संदर्भिय पत्र क्र-९ च्या पत्रानुसार, तक्रारदार श्री.महेश पाटील यांच्या तक्रारीनुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील ख-या कन्नड भाषिक विद्यार्थीना न्याय मिळवुन देण्याबाबत, १८ शिक्षकांचे नांव शालार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट न करणेबाबत व कन्नड भाषेचा अल्पसंख्यांक दर्जा तात्काळ रद्द करणेबाबत चौकशी करण्यासाठी या कार्यालयाची त्रिसदस्य समितीने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास भेट देऊन तपासणीसाठी कागदपत्राची मागणी केली असता ~~आपण~~ प्राचार्य आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री.हुली यांनी सदर समितीस सुमारे ०४ तास बसवुन ठेऊन समितीने मागितलेले एकही कागदपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दिलेली नाहीत, याउलट शासकीय समितीवर कायदेशिर कारवाई करण्याबाबतची धमकी संबधितांनी समितीस


Scanned by CamScanner

दिलेली आहे, स्वतः प्राचार्य यांनी त्यांच्या स्वाक्षरीने दि. २६.०३.२०१९ रोजी समितीस १५ दिवसात कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतील असे लेखी देऊन सुध्दा आजअखेर त्यांनी समितीस कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबधित प्राचार्य, आणि श्री. हुल्ली, उपप्राचार्य यांनी शासकीय कामात जाणुनबुजून अडथळा आणुन शासकीय कर्मचा-यांना त्यांचे कामकाज करण्यापासून रोखलेले आहे. त्याचप्रमाणे प्राचार्य यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने समितीस कागदपत्रे उपलब्ध करु देण्याबाबत लेखी आश्वासन देऊन सुध्दा कागदपत्रे देण्यास आज अखेर टाळाटाळ केलेली असल्यामुळे संबधित प्राचार्य, श्रीम.राजमाने, यांच्यावर युजीसी कायदयांतर्गत शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करावी, त्याचप्रमाणे श्री.हुल्ली ए के, उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय विभाग, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांच्यावर महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाचे कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन केलेल्या कारवाईचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

(प्रविण आहिरे)
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग,पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा.आयुक्त(शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१.
२) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१.
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सोलापूर

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे -१, यांचे कार्यालय
10 JUL 2019
४१०८

Scanned by CamScanner